MHKO100011382020

**नियमीत दिवाणी दावा क्र. ९४/२०२०**

रोमा शिंदे वगैरे
विरुध्द
संभाजी देसाई

## निशाणी क्र. ४९ वरील आदेश

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा हक्कज्ञापनासाठी, कब्जासाठी व आज्ञार्थी मनाईसाठी दाखल केला आहे. दावेचे कामी प्रतिवादी क्र. ६ म्हणून जानबा लक्ष्मण फगरे यांचे नाव नेसरी, तालुका गडहिंग्लज गट नं. ३०५ चे धारक म्हणून नोंद केले होते. परंतू सध्या जानबा लक्ष्मण फगरे यांचे नाव कमी करुन सदर गट नं. ३०५ चे ७/१२ व ८अ पत्रकी सुनिता सुरेश फगरे यांचे नाव मालक व वहिवाटदार सदरी नोंद आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ६ जानबा लक्ष्मण फगरे यांचे नावास काट मारणेकरीता व दावा प्रलंबित असताना मौजे नेसरी, तालुका गडहिंग्लज येथील गट नं. ३०६ ची मिळकत प्रतिवादी क्र. ७अ व ७ब यांनी उज्वला सचिन देसाई व करण अरुण जाधव यांना दस्त रजि. नं. २१७८/२०२२ दिनांक ०७/०६/२०२२ रोजी खरेदी दस्ताने विक्री केलेले आहे. त्यामुळे सदर खरेदी घेणार यांना प्रतिवादी क्र. १३ व १४ म्हणून सामील करणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही अनुषंगिक स्वरुपाची आहे व सुचविले दुरुस्तीमुळे दावेचे मुळ स्वरुपात मुळीच बदल होणार नाही. सबब अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास निशाणी क्र. ६० वर आपले म्हणणे सादर केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. ६ जानबा लक्ष्मण फगरे यांचे नाव गट नं. ३०५ चे ७/१२ पत्रकी कमी होवून सुनिता सुरेश फगरे यांचे नाव

केव्हा व कसे वहिवाटदार म्हणून लागले याचा उल्लेख वादी यांनी सदर अर्जात केलेला नाही. तसेच प्रतिवादी क्र. १३ व १४ यांची नावे दिनांक ०७/०६/२०२२ रोजीच्या खरेदीदस्ताने गट नं. ३०६ च्या मिळकतीला लागली आहेत. ही बाब वादी यांना माहित असून देखील वादी यांनी प्रतिवादी क्र. १३ व १४ यांना दावेत पक्षकार म्हणून सामील करणेसाठी जवळपास १ वर्षानंतर अर्ज केला आहे. वादी यांनी जाणुनबुजून प्रतिवादी यांना त्रास देणेसाठी व काम लांबविणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दिला आहे. सबब सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा व मंजूर करावयाचा झालेस वादीवर खर्च रू. ५०००/- बसविणेत यावा.

४. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजुचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

५. वादी यांनी सदरचा दावा हक्कज्ञापनाकरीता, वाटपाकरीता व कायम मनाईकरीता दाखल केला आहे. वादी यांनी मागीतलेली दुरुस्ती ही दावा मिळकतीशी सलग्न व दावा दाखल केल्यानंतर झालेल्या घडामोडीबाबत दिसते. त्यामुळे, प्रस्तुत दावा गुणदोषावर चालवून दोन्ही बाजुंमधील मुळ वाद निकाली काढणेकरीता प्रस्तावित दुरुस्ती आवश्यक आहे. सदर प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्यामधील कथनांशी सुसंगत असल्याने दाव्यात कोणतेही बदल होणार नाहीत. ज्यावेळी प्रस्तावित दुरुस्ती ही पक्षकारांमधील वाद मिटविण्याच्या दृष्टीने आणि पक्षकारांमध्ये त्याच मुद्यावर नवीन प्रकरणे दाखल होण्यापासुन रोखण्याकरीता आवश्यक असेल त्यावेळी सदर दुरुस्ती करण्यास परवानगी देता येते. प्रतिवादी यांनी आपल्या म्हणण्यामध्ये वादी यांनी प्रस्तावित दुरुस्ती मागणेस विलंब केला आहे अशी हरकत घेतली आहे. वादी यांनी सदरचा अर्ज २२/०६/२०२३ रोजी दाखल केलेला आहे व दुरुस्तीन्वये जी दाद मागत आहेत ते खरेदीपत्र दिनांक ०७/०६/२०२२ रोजी झालेले आहे. यावरुन असे दिसून येते की, वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज विलंबाने दिलेला आहे. प्रस्तुत अर्जास वादीतर्फे झालेल्या विलंबाचा विचार करता प्रतिवादीस झालेल्या त्रासाकरीता प्रस्तुत अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य होईल. त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१ प्रतिवादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये ५००/- (रक्कम रुपये पाचशे मात्र) देणेच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येतो.

२ वादी यांनी अर्जात सुचविलेली दुरुस्ती १४ दिवसांच्या आत दाव्यामध्ये करुन त्याअनुषंगाने दुरुस्त दाव्याची प्रत न्यायालयात सादर करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2024.10.07 16:55:20 +0530

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

ठिकाण - गडहिंग्लज.
दिनांकः ०७/१०/२०२४.